डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

# महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील ७० उमेदवारांना बार्टी संकुल येरवडा, पुणे येथे संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेच्या पुर्व तयारी साठी निवासी प्रशिक्षण योजना

**योजनेचे स्वरूप -**

१. बार्टी संकुल, येरवडा, पुणे येथे संघ लोकसेवा आयोग – नागरी सेवा परीक्षेचे (पूर्व व मुख्य) निवासी पूर्व प्रशिक्षण कालावधी – १० ते ११ महिने
२. विद्यावेतन प्रती माह रक्कम रु. २५००/- (कमीत कमी ७५% उपस्थिती अनिवार्य)

**पात्रता -**

१. उमेदवार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील असावा.
२. उमेदवार पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा.
३. उमेदवाराचे वय १ ऑगस्ट २०२३ रोजी २१ ते ३७ वर्षापर्यंत असावे.
४. कौटुंबिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये

(टिप : ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी मार्फत राबविल्या जाणाऱ्या संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण (उदा. यशदा, Pre-IAS केंद्र, दिल्ली, महाराष्ट्र) घेतले आहे असे उमेदवार अर्ज करण्यास अपात्र आहेत. यापूर्वी उमेदवाराने बार्टीच्या दिल्ली येथील यु.पी.एस.सी. प्रशिक्षणाकरिता लाभ घेतला असल्यास संबधित उमेदवाराची प्रशिक्षणातील उमेदवारी रद्द करण्यात येईल.)

**आरक्षण -**

- एकूण जागांच्या 30 % जागा महिला उमेदवारांसाठी आरक्षित
- एकूण जागांच्या 5 % जागा दिव्यांग उमेदवारांसाठी आरक्षित

**परीक्षेचे स्वरूप –**

उमेदवारांची निवड करण्याकरिता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC) मुंबई, यांच्या मार्फत एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात येत असून त्याकरिता परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे –

| पेपर | प्रश्न संख्या | गुण | पेपरचे स्वरूप |
|---|---|---|---|
| पेपर - I<br>सामान्य अध्ययन - I | ५० | १०० | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी<br>भाषा - इंग्रजी आणि हिंदी |

| | | | |
|---|---|---|---|
| पेपर - I<br>सामान्य अध्ययन - II | ४० | १०० | वेळ- २ तास<br>नकारात्मक गुण — १/३ |
| मुलाखत | - | ५० | मुलाखत ही ऑनलाईन स्वरुपात होईल. |
| **एकूण** | | **२५०** | |

- पेपर II (CSAT) चे स्वरूप हे पात्रता पेपर (Qualifying) असे आहे. पेपर II (CSAT) मध्ये किमान ३३% किंवा त्यापेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे.
- अंतिम गुणवत्ता यादी ही सामान्य अध्ययन - I आणि मुलाखतीच्या गुणांवर आधारीत असेल.

**<u>योजनेच्या अटी -</u>**

१. प्रशिक्षणास रुजू झाल्यानंतर बायोमेट्रिक हजेरीच्या आधारे उमेदवारांना विद्यावेतन अदा करण्यात येईल. प्रत्येक महिन्याचे उपस्थिती पत्रक प्राप्त झाल्यावरच विद्यावेतन अदा करण्यात येईल. प्रत्येक दिवशी विद्यार्थ्याने क्लासला उपस्थित राहण्याकरिता येता-जाता (in-out) दोन्ही वेळचे thumb impression विचारात घेतले जाईल. एका वेळेला तशी नोंद नसल्यास त्या दिवसाची अनुपस्थिती ग्राह्य धरून विद्यावेतन अदा केले जाणार नाही. विद्यार्थ्यांनी सत्राला उपस्थित न रहाता बार्टीकडे विद्यावेतनाकरिता दबाव आणणे याकरिता विद्यार्थ्यास प्रशिक्षणाकरिता अपात्र ठरविले जाईल.

२. विद्यार्थी निवड अंतिम करण्यापूर्वी संबंधितांचे जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र व इतर शैक्षणिक कागदपत्र यांची पडताळणी बार्टी, पुणे येथे करण्यात येईल.

३. निवड यादीतील उमेदवारांची कागदपत्र पडताळणी करण्यात येईल. कागदपत्र पडताळणीबाबत निवड झालेल्या उमेदवारांनी दिलेल्या ई मेलवर किंवा बार्टीच्या Notice Board वर कळविण्यात येईल. उमेदवारांनी स्वत:चा ईमेल व अर्ज करतेवेळी घोषित केलेली माहिती वेळोवेळी तपासावी. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या हलगर्जीपणामुळे त्यांच्या होणाऱ्या नुकसानीस बार्टी संस्था उत्तरदायी राहणार नाही.

४. निवड झालेल्या उमेदवारांना संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षेच्या पूर्व व मुख्य परीक्षा पूर्व तयारीच्या निवासी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल तर उमेदवारास बार्टी संस्थेसोबत रु. १०० च्या स्टँप पेपरवर प्रशिक्षणातील अटी व नियमांच्या पालनाबाबतचा करार करावा लागेल. करारनामा सही करतेवेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. कागदपत्रांची पडताळणी ही पुणे येथे करण्यात येईल. जर निवड यादीतील उमेदवार सदर करार करण्यास कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास त्यांची प्रशिक्षणाकरिताची उमेदवारी रद्द ठरविण्यात येईल. तसेच या प्रशिक्षणामधून मिळणाऱ्या कोणत्याही लाभास तो पात्र ठरणार नाही.

५. सदर प्रशिक्षणाचा लाभ घेण्याकरिता कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा कमी घोषित करण्यात आली आहे. अन्यथा उमेदवाराचा प्रशिक्षणासाठी प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही. याबाबत कोणत्याही राजकीय किंवा शासकीय दबावतंत्राचा वापर केल्यास उमेदवारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

६. प्रशिक्षाणार्थ्यांना निवासी प्रशिक्षणादरम्यान अर्थार्जनास (नोकरी, व्यवसाय करण्यास) मनाई आहे.

७. उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण सोडायचे असल्यास त्या उमेदवारास

प्रशिक्षणादरम्यान त्याकरिता संस्थेने केलेला खर्च पुन्हा बार्टी संस्थेस द्यावा लागेल.

**कागदपत्र पडताळणीकरिता आवश्यक कागदपत्रे –**

१. दहावी प्रमाणपत्र / जन्माचा दाखला (SSC certificate or Date of Birth Certificate )
२. पदवी प्रमाणपत्र (Certificate of Graduation)
३. जात प्रमाणपत्र ( Caste Certificate)
४. जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate)
५. कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला (Income Certificate of family (income from all the sources))
६. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
७. SIAC-CET २०२२ परीक्षेचे प्रवेश पत्र (Admit Card)
८. रु. १०० चा कोरा स्टँप पेपर
९. आधार कार्ड/ओळख पत्र/पॅनकार्ड/ वाहन चालक परवाना (Driving License)/ निवडणूक ओळखपत्र
१०. पासपोर्ट आकाराचे दोन फोटो
११. दिव्यांग करिता आरक्षित जागेकरिता ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक.